भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DY 667244

21 NOV 2025

दिनांक वि.क्र. 30299 मुद्रांक शुल्क रक्कम - 500

दस्त नोंद करणार आहे का-होय/नाही, नोंदणी होणारे दु.नि.कार्या.

दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक / कारण MOU.

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता प्राचार्य नाईट कॉलेज कोल्हापूर

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता

हस्ते नांव व पत्ता

मोबदला रक्कम - मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विक्रेत्याची सही

परवाना सहीत मुद्रांक विक्रेत्याचे नांव व पत्ता - चंद्रकांत सिताराम पिंपळे

(स्टँप व्हेंडर) ला. नं. ११९/८८,

कोड नं. २६०१०३२ महालक्ष्मी चेंबर्स, शॉप नं. ई-२८ कोल्हापूर

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

17 NOV 2025

STAMP HEAD CLERK
TREASURY OFFICE
KOLHAPUR (M.S.)

# सामंजस्य करार

## (MEMORANDUM OF UNDERSTANDING)

## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

## मराठी विभाग

## आणि

## राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर



प्राचार्य
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड कॉमर्स
कोल्हापूर.

आजीव अध्यक्ष / संस्थापक
राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी
कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर या संस्था एकमेकांबरोबर दि. 21 नोव्हेंबर 2025 रोजी सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

- **उद्दिष्टे**

1. मोडी लिपी, मोडी साहित्य यांचे जतन व संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे
2. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्य संमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे
3. मोडीविषयक अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्सेस राबविणे व त्यासाठी सहयोग व सहकार्य करणे.
4. मोडी लेखन, मोडी लिप्यंतर निबंध इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे
5. मोडी शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन व लिप्यंतरविषयक प्रकल्प राबविणे
6. मोडी लिपी, कागदपत्रांचे जतन व लिप्यंतरविषयक प्रकल्प राबविणे
7. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे
8. मोडी लिपी, मोडी साहित्य या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, इत्यादींना कळविणे व त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
9. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे
10. दोन्ही संस्थांच्या हिताचे विविध उपक्रम राबविणे

- **एकमेकांना साहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

1. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे
2. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे
3. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थांकडून एक निश्चित योजना तयार करणे
4. सल्ला, सेवा, साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे
5. मोडी लिपी व साहित्याचे चर्चासत्र, अधिवेशन, कार्यशाळा घेऊन विचारविनिमय करणे
6. शासन, साहित्य व संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांच्या सौजन्याने विविध प्रकल्प राबविणे



प्राचार्य
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स,
कोल्हापूर.

आजीवन अध्यक्ष / सेक्रेटरी
राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी
कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner

- **अटी**

1. आपापल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे
2. कोणत्याही संस्थेस प्रवास व भोजनभत्ता देणे बंधनकारक नाही.
3. सदर परस्पर **सामंजस्य कराराचा कालावधी दहा वर्षांचा म्हणजे आज दि. 21 नोव्हेंबर 2025 पासून ते दि. 20 नोव्हेंबर 2035 पर्यंत आहे.** त्यानंतर क़रार आपोआप संपुष्टात येईल. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.
4. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल

- **समन्वय**

1. सदर कराराच्या समन्वय आणि अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष अथवा सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य अथवा मराठी विभागप्रमुख काम करतील
2. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.
3. दोन्ही संस्थांच्या वतीने खाली स्वाक्षरी केलेल्या अधिकाऱ्याच्या वतीने सदरहू सामंजस्य करार हा दि. 21 नोव्हेंबर 2025 पासून अंमलात येत आहे.

प्रा. डॉ. अरुण शिंदे
विभागप्रमुख व समन्वयक
नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स
कोल्हापूर

प्रा. डॉ. उत्तम पाटील
प्राचार्य
प्राचार्य
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स,
कोल्हापूर.

श्री. उदयसिंह राजेयादव
अध्यक्ष
आजीवन अध्यक्ष / सेक्रेटरी
राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी
कोल्हापूर
कोल्हापूर



कोल्हापूर.

Scanned with OKEN Scanner